दूरध्वनी क्र. ०७१२-२९७०५६२

Email ID:
mahabamboo@mahaforest.gov.in

**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालय**
**नविन काटोल नाका चौक, गोरेवाडा रोड, नागपूर-१३**

---

**महाराष्ट्र बांबू विकास मंडळ नागपूर यांचे कार्यालयातंर्गत कंत्राटी पध्दतीने बांबू क्लस्टर समन्वयक / वनवृत्त समन्वयक यांची मानधन तत्वावर निवड करण्याबाबत**

## 1) बांबू क्लस्टर समन्वयक (Bamboo Cluster Coordinator):

**a)कार्यक्षेत्र :** महाराष्ट्र बांबू विकास मंडळ कार्यक्षेत्रातंर्गत बांबू विषयक कामे करण्यासाठी दिलेल्या जिल्ह्यातील तालुका स्तरावर बांबू क्लस्टर समन्वयक यांची कंत्राटी तत्वावर मानधन स्वरूपात नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | संख्या (अंदाजित) |
|---|---|---|
| 1 | अहिल्यानगर | 1 |
| 2 | अकोला | 3 |
| 3 | अमरावती | 5 |
| 4 | बुलढाणा | 2 |
| 5 | जालना | 5 |
| 6 | परभणी | 4 |
| 7 | नांदेड | 1 |
| 8 | नंदूरबार | 1 |
| 9 | पालघर | 3 |
| 10 | वाशिम | 2 |
| 11 | यवतमाळ | 10 |
| 12 | नाशिक | 2 |
| 13 | गडचिरोली | 1 |

तरी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. उमेदवारांची पात्रता खालील प्रमाणे राहील.

**अटी व शर्ती**

**b)पात्रता :**

(i) **शैक्षणिक :**

- B.Sc Forestry / B.Sc Agriculture / बांबू तंत्रज्ञान पदविका (BRTC)
- त्या जिल्ह्यातील स्थानिक असल्यास **प्राधान्य.**
- संगणकीय ज्ञान आवश्यक.

(ii) **वय :**

- 18 ते 45 (2 जुलै 2026 रोजी वय 45 वर्षापेक्षा जास्त नसावे)

**c) कामाचे स्वरूप**

- शेतक-यांना भेटी देऊन बांबू लागवडीकरीता प्रोत्साहित करणे.
- शेतक-यांनी लागवड केलेल्या बांबू रोपवनाचे मुल्यांकन करणे.
- लागवडीकरीता रोपांचे नियोजन करून बांबू रोपांचा पुरवठा करणे, मार्गदर्शन, प्रचार व प्रसिध्दी करणे इत्यादी.
- संगणकीय प्रणालीमध्ये माहिती वेळोवेळी अद्यावत करणे.
- बांबू संदर्भातील कामाकरीता इतर विभागाशी संपर्कात राहणे.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्य करणे.
- तालुकास्तरवर / गावस्तरावर मुख्यालयी मुक्कामी राहणे बंधनकारक असेल.

**d) मानधन :** निवड झालेल्या उमेदवाराला Rs. 20,000/- तसेच प्रवास भत्ता रू.5,000/- असे एकूण रू.25,000/- मासिक मानधन देण्यात येईल.

e) **टिप :** वरील पात्रतेबाबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

आवश्यक प्रमाणपत्र : पदवी / पदवीका प्रमाणपत्र (BRTC), आधार कार्ड, MSCIT प्रमाणपत्र, जन्मदाखला

f) कंत्राटी कालावधी : 11 महिणे

## 2) वनवृत्त समन्वयक (Circle Coordinator) :

a) **कार्यक्षेत्र :** महाराष्ट्र बांबू विकास मंडळ कार्यक्षेत्रातंर्गत बांबू विषयक कामे करण्यासाठी वनवृत्त समन्वयक (Circle Co-ordinator) यांची कंत्राटी तत्वावर मानधन स्वरूपात निवड करावयाची आहे.

| अ.क्र. | कामाचे ठिकाण व कार्यक्षेत्र (वनवृत्त स्तरावर) | संख्या |
|---|---|---|
| 1 | **नागपूर** (नागपूर, वर्धा, गोंदिया व भंडारा) | 2 |
| 2 | **कोल्हापूर** (कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदूर्ग व रत्नागिरी) | 1 |

तरी वनवृत्त समन्वयक (Circle Co-ordinator) यांची कंत्राटी कामाकरीता मानधन तत्वावर निवड करावयाची असल्याने ईच्छुक व अनुभवी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. उमेदवारांची पात्रता खालील प्रमाणे राहील.

**b) वनवृत्त समन्वयक (Circle Coordinator) उमेदवार पदाची पात्रता :**

- B.sc Forestry / M.sc Forestry / B.sc Agriculture / M.sc Agriculture किंवा वनविभागातील सेवानिवृत्त राजपत्रीत अधिकारी
- संगणकीय ज्ञान व्यक्तीला प्राधान्य. (MS-CIT, Word, Excel, power point तसेच इतर ऑनलाईन पोर्टल संदर्भातील कामे)

C) **कामाचे स्वरूप**

- बांबू लागवडीबाबत शेतक-यांना योग्य मार्गदर्शन करणे.
- बांबू संदर्भातील कामाकरीता इतर विभागाशी संपर्क साधणे.
- संगणकीय प्रणालीमध्ये माहिती वेळोवेळी अद्यावत करणे.
- शेतक-यांनी लागवड केलेल्या बांबू रोपवनाचे मुल्यांकन करणे.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्य करणे.

**d) मानधन :** निवड झालेल्या उमेदवाराला Rs. 35,000/- तसेच प्रवास भत्ता रू.5,000/- असे एकूण रू.40,000/- मासिक मानधन देण्यात येईल.

**e)** कंत्राटी कालावधी : 11 महिणे

तरी ईच्छूक व पात्र उमेदवारांनी **दि. 02/ 07/ 2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत महाराष्ट्र बांबू विकास मंडळ कार्यालय, काटोल नाका चौक, गोरेवाडा रोड, नागपूर** येथे आपले अर्ज पोहचविणे अथवा कार्यालयाचे ईमेल- mahabamboo@mahaforest.gov.in वर पाठवावे. पात्र उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलाविण्यात येईल.

23/06/2026

(पी. कल्याण कुमार)
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ
महाराष्ट्र राज्य